# २०२१ – २०२२

## ग्रंथालय विभाग

ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेचा आरसा असतो. या म्हणीप्रमाणे आपले महाविद्यालयाचे ग्रंथालय समृध्द आहे. आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ पर्यत ३९७५३ एवढी ग्रंथ संपदा होती, शैक्षणिक वर्ष २०२१ –२०२२ या कालावधीत २७२ ग्रंथाची भर पडली अशा प्रकारे ग्रंथ संग्रहात वाढ झाली. आज मितीस एकूण ४००२५ ग्रंथसंख्या आहे. तसेच आपल्या महाविद्यालयात मुबई विद्यापीठांतर्गत चालविण्यात येणाऱ्या पुस्तकपेढी योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२० – २०२१ पर्यत ७४०४ एवढी ग्रंथ संपदा होती शैक्षणिक वर्ष २०२१ –२०२२ या कालावधीत ५७२ ग्रंथाची भर पडली अशा प्रकारे ग्रंथ संग्रहात वाढ झाली, असे एकूण ७९७६ ग्रंथसंख्या आहे. याचबरोबर विविध विषयाचे ५० नियतकालिके, ०६ वर्तमानपत्रे ग्रंथालयात नियमित येतात. नियतकालिकांचे ५४० बांधीव खंड आहेत. ३१८ सीडी, २७ कॅसेट उपलब्ध आहेत.

ग्रंथालयाचे संगणकीकरण पूर्ण होऊन सर्व कामे SOUL 3.0 (INFLIBNET-UGC) या सॉफ्टवेअर व्दारे केली जातात. ग्रंथालयात इंटरनेट सुविधा मोफत पुरविली जाते. मुलींसाठी, मुलांसाठी, संशोधक, व प्राध्यापकांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय करण्यात आली आहे.

संदर्भ विभागामध्ये विविध विषयावरचे विश्वकोश, शब्दकोश, गॅजेटियर्स स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक आणि उपयुक्त, त्याचबरोबर महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विविध अंगी माहिती देणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्धा आहेत. स्पर्धा परीक्षावर आधारीत अनेक पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर SET, NET अशा परीक्षांसाठी लागणारी पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिली आहेत.

२०२१ – २०२२ या शैक्षणिक वर्षात विविध मान्यवरांनी ग्रंथालयास भेट देऊन चांगल्या प्रतिक्रिया देऊन सुचनाही दिल्या.

ग्रंथालयात दरवर्षी राष्ट्रीय नेते व समाजसुधारक यांच्या जयंती साजरी केल्या जातात. त्याचबरोबर त्यानी लिहीलेल्या व त्यांच्यावर लिहीलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरविले जाते.

प्रथम वर्ष बी.ए.,बी.कॉम,बी.एस.सी.आय.टी, बँकिंग इंसूरन्स व अकाऊंट अँड फायनान्स या विद्यार्थांसाठी (User Orientation) ग्रंथालयीन सेवा व सुविधा बद्द्ल माहिती करून दिली जाते

वेळोवेळी विद्यार्थ्यांना माहिती किंवा पुस्तके मिळविण्यासाठी अडचणी येतात, तेव्हा ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन व मदत करत असतो.

विद्यार्थांना सात दिवसासाठी दोन पुस्तके दिले जातात. त्याच बरोबर वाचनकक्षात बसून अभ्यास करण्यासाठीही पुस्तके दिले जातात. जे विद्यार्थी विविध स्पर्धाव्दारे महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असतात अशा विद्यार्थ्यांना यासाठी अतिरिक्त पुस्तके दिली जातात. महाविद्यालया व्यतिरिक्त बाहेरील वाचकांना ग्रंथालयाच्या वाचनकक्षात बसून अभ्यास करण्यासाठी मोफत सेवा दिली जाते.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणा-या मुंबई विद्यापीठ पुस्तक पेढी योजनेअंतर्गत

विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी पुस्तकांचा संच दिला जातो. आपल्या ग्रंथालयाच्या सोयी, सुविधा आणि इतर सेवा संदर्भात सर्व माहिती आपल्या ग्रंथालयाच्या Website वर दिली जाते, तसेच ग्रंथालयाचा Blog सुध्दा कार्यरत आहे. यावर्षी ग्रंथालयातर्फे Institutional Repository (http://59.95.98.134:8080/jspui/) बनविण्यात आली आहे. यावर जुन्या प्रश्नपत्रिका, नवीन येणा-या पुस्तकांच्या याद्या, वर्तमानपत्रांचे कात्रणे, अभ्यासक्रम, आणि इतर वाचनीय माहिती संग्रहीत करुन वाचकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

पुस्तके शोधण्यासाठी WEB OPAC ची सुविधा देण्यात आली आहे. नवीन येणारे पुस्तके विद्यार्थ्यांना Web OPAC (http://59. 95.98.134/SOULWEBOPAC/Default.aspx) व्दारे पाहता येतात व सूचना फलकावर प्रदर्शित केले जातात.

या सर्व सेवा व सुविधा देण्यासाठी महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, ग्रंथालय समिती, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, आणि सर्व विद्यार्थी सहकार्य करत असतात.

डॉ. एस. एस. वाघमोडे
ग्रंथपाल

ANILKUMAR SHIVNARAYAN SINGH

Digitally signed by ANILKUMAR SHIVNARAYAN SINGH
Reason: I am the author of this document
Date: 2022.12.02 12:39:42+05'30'